**ज्या गावांच्या/वाडयांच्या जवळपास खात्रीचा स्त्रोत उपलब्ध नसल्यामुळे दुरुन पाणी आणावे लागत असेल तर, या प्रकरणी लोकसहभागाची रक्कम लाभार्थ्यांकडून घेण्याची कार्यपध्दती.**

महाराष्ट्र शासन,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन निर्णय क्र.ग्रापापु-१००३/प्र.क्र. ७५/पापु-०७,
मंत्रालय, मुंबई :- ४०० ०३२. दिनांक :- १ जुलै, २००३

वाचा :-
(१) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१०९९/प्र.क्र.३२८/पापु-०७ दि. २७.७.२०००.
(२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००१/प्र.क्र.३०४/पापु-०७ दि. २०.९.२००१.

प्रस्तावना :-

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी संदर्भिय क्र.१ येथील दिनांक २७ जुलै २००० च्या शासन निर्णयान्वये सुधारित मार्गदर्शक सूचना लागू करण्यात आल्या आहेत. या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित योजनेच्या लाभार्थ्यांनी योजनेच्या भांडवली खर्चातील १० % हिस्सा उचलावयाचा असून योजनेच्या व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीचा १०० % खर्च लाभार्थ्यांनीच करावयाचा आहे.

२. असे असले तरी, ज्या गावातील / वाडीतील पाण्याची गुणवत्ता बाधित आहे अशा पाणी गुणवत्ता बाधित गावांना व वाडयांना दुरुन पाणी आणावे लागत असेल तर, अशा योजनेच्या भांडवली खर्चापैकी, योजनेच्या स्त्रोतापासून ते वितरण व्यवस्थेच्या मुख्य टाकीपर्यंतचा (टाकीचा खर्च वगळून) भांडवली खर्च वजा करुन योजनेच्या उर्वरित भंडवली खर्चाच्या १०% भाग लाभार्थ्यांनी जमा करावा व शासनाच्या लोकसहभागाचा विचार करतांना १.५ कि.मी.च्या पुढे मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे आवश्यक संपूर्ण खर्च ग्रामस्थांना देण्यात येईल. असे आदेश संदर्भिय क्र.२ येथील दिनांक २०.९.२००१ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

३. परंतु , ज्या गावांना/वाडयांना जवळपास पिण्याच्या पाण्याचा खात्रीचा स्त्रोत उपलब्ध नसल्यामुळे त्यांना दुरुन पाणी आणावे लागते व पर्यायाने योजनेच्या भांडवली खर्चात वाढ झाल्यामुळे लाभार्थ्यांनाही लोकसहभागाची रक्कम अधिक भरावी लागते. या सर्व बांबींचा विचार करुन ज्या गावांना/वाडयांना गावाजवळ पिण्याच्या पाण्याचा खात्रीचा स्त्रोत नसल्यामुळे दुरुन

पाणी आणावे लागत आहे अशा गावाच्या/वाडीच्या लाभार्थ्यांना लोकसहभागाच्या रक्कमेमधून काही प्रमाणात सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन संदर्भिय क्र.२ येथील शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येवून राज्यातील ज्या गावांच्या/वाडयांच्या जवळपास पिण्याच्या पाण्याचा खात्रीचा स्त्रोत ( पाणी गुणवत्ता बाधित असल्यामुळे अथवा इतर कोणत्याही कारणास्तव ) उपलब्ध नसल्यामुळे त्या गावांना/वाडयांना दुरुन पाणी आणावे लागणार असेल तर, अशा गावाच्या/वाडीच्या योजनेच्या भांडवली खर्चाचा लाभार्थ्यांनी भरावयाच्या लोकसहभागाचा भाग पुढे नमूद केलेल्या सुत्रानुसार योजनेच्या संबंधित लाभार्थ्यांकडून घेण्यास शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र | योजना तयार करताना प्रत्यक्षात असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात योजनेचा दरडोई भांडवली खर्च (रुपयात) | लाभार्थ्यांनी भरावयाची लोकसहभागाची किमान रक्कम |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | २५०० पर्यंत | १० % ( रु.२५०) |
| २ | २५०१ ते ३००० | वरील एक मधील रक्कम अधिक रु.२५०० पेक्षा वाढीव रकमेच्या ७ % (२५०+३५ = २८५ ) |
| ३ | ३००१ ते ३५०० | वरील दोन मधील रक्कम अधिक रु.३००० पेक्षा वाढीव रकमेच्या ५ % (२८५+२५ = ३१० ) |
| ४ | ३५०१ ते ४००० | वरील तीन मधील रक्कम अधिक रु.३५०० पेक्षा वाढीव रकमेच्या ३ % (३१०+१५ = ३२५ ) |
| ५ | ४००० पेक्षा अधिक | वरील चार मधील रक्कम अधिक रु.४००० पेक्षा वाढीव रकमेच्या १ % (३२५+ रु.४००० पेक्षा वाढीव रकमेच्या १ % ) |

,महाराष्ट्राचे राज्यपाल याच्या आदेशानुसार व नावाने

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. राज्यपाल यांचे सचिव,

२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

**D:\१० % countrubution ०३\१०% contribution c.r.७५ १.७.०३.doc**

३. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. विभागीय आयुक्त, (सर्व)
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
८. सर्व जिल्हाधिकारी,
९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
११. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, (सर्व).
१२. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१३. कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई ( लेखा परिक्षा)
१५. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर ( लेखा परिक्षा)
१७. महालेखापाल, महाराष्ट्र-, नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
१८. उप अभियंता, पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, (सर्व)
१९. मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा, मुंबई
२०. मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा, नाशिक , पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२१. मंत्रालयातील सर्व विभाग,
२२. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,(सर्व).
२३. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,(सर्व).
२४ . पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व सर्व कार्यासन अधिकारी.
२५ . निवड नस्ती (पापु-०७)